POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१८५ ● मुंबई, शुक्रवार, ०६ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.


MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## थंडीनं ओलांडली महाराष्ट्राची वेस!

### आता चाहूल फक्त होरपळीची...
### हवामान बदलांचा नागरिकांवर ‘असा’ परिणाम

■ बातमी /लेख, विनोद दशरथ मेढे

फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीपासूनच महाराष्ट्रासह देशभरात हवामानाचे तालरंग बदलण्यास सुरुवात झाली असून, आता हिमालय क्षेत्रात नव्यानं एक पश्चिमी झंझावात सक्रिय होत असून, त्यामुळं पुढील काही दिवस उत्तर भारतात तुलनेनं थंडीचा कडाका कमी झाला असला तरीही दिल्ली, उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरियाणासह उर्वरित राज्यांमध्ये गारठा कायम असेल. तर काही भागांमध्ये पावसाचाही इशारा देण्यात आला आहे. यादरम्यान मेघगर्जनेसह देशाच्या राजधानीत पावसाचा अंदाज आहे.



**महाराष्ट्रात उकाडा वाढतोय, आरोग्य जपा...**

महाराष्ट्रातही हवामान बदलांचं सत्र सुरू असून, तापमानवाढीमुळं नागरिकांच्या आरोग्यावर या स्थितीचा परिणाम होताना दिसत आहे. राज्यात कमाल तापमानाचा आकडा सरासरी तीस अंशांच्या पुढं गेला असून, त्यामुळं आता उन्हाळ्याच्या पर्वास सुरूवात झाली असून थंडीनं राज्याची वेस ओलांडल्याचं स्पष्ट होत आहे.

कोकण, विदर्भ, मध्य महाराष्ट्रात उष्मा जाणवण्यास सुरूवात झाली असून हवेतील गारठ्याची जागा आता उष्ण वारे घेत असल्याची जाणिव होत आहे. मुंबई शहर आणि उपनगरांमध्येसुद्धा हवामानाची ही स्थिती कायम असून, येत्या दिवसांच उकाडा आणखी वाढेल असा अंदाज आहे. देशाच्या दक्षिण किनारपट्टीवर अरबी समुद्रामध्ये सध्या केरळ आणि नजीकच्या किनाऱ्यांपासून १.५ किमी उंचीवर चक्राकार वारे निर्माण होत असल्यानं केरळपासून कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला आहे. ज्यामुळं दक्षिण भारतात पावसाच्या सरींचीसुद्धा शक्यता वर्तवण्यात आली आहे.

देशाच्या दक्षिणेसह उत्तरेकडे होणाऱ्या हवामान बदलांचा संमिश्र परिणाम महाराष्ट्रावर पाहायला मिळत असून, पुढील २४ तासांमध्ये राज्यातील हवामान अंशतः ढगाळ असेल आणि हवेतील आर्द्रतेचं प्रमाण वाढेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**पर्वतांमध्ये हिमवर्षावास पूरक स्थिती...**

जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि लडाखसह उत्तराखंडमध्ये अतीव उंचीवर असणाऱ्या भागांमध्ये तूफान हिमवृष्टी सुरू झाली असून पावसाचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. हिमाचलमधील चंबा, कुल्लू आणि किन्नौर जिल्ह्यांमध्ये या स्थितीला अनुसरून ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आहे. देशातील हवामान बदलांचं हे सत्र ८ फेब्रुवारीपर्यंत कायम राहणार असून झंझावात यास सक्रिय असणार असल्याचं हवामान तज्ज्ञांनी स्पष्ट केलं आहे.

### मुंबईतील तापमानात सतत चढ-उतार काय सांगतो हवामान विभागाचा अंदाज?

फेब्रुवारीच्या सुरूवातीपासूनच महाराष्ट्रत गारठा कमी होत असल्याचं जाणवू लागलं असून कोकण किनारपट्टीवरील वातावरण दमट होण्यास सुरूवात झाली आहे. मुंबईमध्ये आज दिवसभार वातावरण उष्ण राहील असा अंदाज हवामान विभागानं काल वर्तवला होता. काही ठिकाणी तर पारा 34 अंश सेल्सियसपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे.

**ढगाळ वातावरण**

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील काही भागांत पावसाचा इशारा देण्यात आला असून, ठिकठिकाणी ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. उत्तर महाराष्ट्रासह कोकणातील काही भागांत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. येते काही दिवस हवामान स्थिर राहून फारसा बदल होणार नसल्याची शक्यता आहे.

**आज उष्ण वातावरण**

मुंबईत गुरुवारी २०२६मधील सर्वाधिक उष्ण वातावरणाची नोंद होण्याची शक्यता आहे. सांताक्रूझसह दक्षिण मुंबईतील काही ठिकाणी तापमानाचा पारा ३४ अंश सेल्सियसवर पोहचणार असून, येत्या काही दिवसांत उष्ण वातावरण कायम राहण्याची चिन्हे आहेत. तसेच, पहाटेच्या वेळेत शहरातील अनेक भागांत धुक्याची चादर पसरत असून, दृष्यमानता कमी होत आहे.

**उत्तर भारतात थंडीचा कडाका**

केंद्रीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार उत्तर भारतात थंडीचा कडाका कायम आहे. हरियाणा, पंजाब, राजस्थान, दिल्ली या ठिकाणी गारठा वाढत असून काही राज्यांमध्ये शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. उत्तर भारतात काही ठिकाणी बर्फवृष्टीसुद्धा होत आहे. त्याचवेळी दक्षिण भारतात उकाडा वाढत असल्याची चिन्ह आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत तर ढगाळ वातावरणासह मुसाळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे यलो अलर्ट देण्यात आला आहे. येत्या २४ तासांत राज्यातील हवामान स्थिर राहून उकाडा वाढण्याची शक्यता आहे. तसेच, मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावत असून आज सकाळी एक्यूआय २८० वर होतं. त्यामुळे मुंबईसह उपनगरातील हवेची गुणवत्ता ढासळली असून नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचं अवाहान केलं गेलं आहे. वाढत्या प्रदुषणामुळे काही मुंबईकरांना श्वास घेण्यात त्रास होत असून, आजारांचे प्रमाण देखील वाढले आहे. वाढत्या तापमानमुळे हवेची गुनवत्ता सुधारण्याची शक्यता आहे.

## ३३ तासांनंतर... अखेर टँकर हटवला
### मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अभूतपूर्व कोंडी फुटली

**महिला, लहान मुलांचे हाल**

मंगळवारी संध्याकाळी ५ वाजण्याच्या सुमारास टँकर उलटल्यानंतर प्रोपलिन गॅसची गळती सुरू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. खबरदारी म्हणून वाहतूक थांबवण्यात आली होती. मुंबईकडे जाणारा मार्ग पूर्णपणे बंद करण्यात आला होता, तर पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर टप्प्याटप्प्याने वाहतूक वळवण्यात आली होती. निर्माण झालेल्या प्रचंड कोंडीमुळे टरफऊउ ने तात्पुरते टोल वसुलीही स्थगित केली होती. जवळपास २०-२५ किमी लांब वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. महिला आणि मुलांसह प्रवासी, अन्न, पाणी किंवा शौचालयाच्या सुविधेविना अनेक तास आपल्या वाहनांमध्ये अडकून पडले होते.



■मुंबई। प्रतिनिधी,

तब्बल ३३ तासांनंतर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अभूतपूर्व वाहतूक कोंडी फुटली असून अडकलेल्या हजारो वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आडोशी बोगद्याजवळ उलटलेला अत्यंत ज्वलनशील प्रोपलिन वायूचा टँकर हटवण्यात आल्यानंतर मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक पहाटे १.४६ वाजता पुन्हा सुरू करण्यात आली, अशी माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) एका अधिकाऱ्याने दिली आहे.

**प्रोपलिन गॅस सुरक्षितरीत्या इतर टँकरमध्ये हस्तांतरित**

एमएसआरडीसी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, बुधवारी रात्री उशिरा उलटलेल्या टँकरमधील प्रोपलिन गॅस सुरक्षितरीत्या इतर टँकरमध्ये हस्तांतरित करण्यात आला. त्यानंतर अवजड क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त टँकर हटवण्यात आला. अखेर गुरुवारी पहाटे १.४६ वाजता मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरू करण्यात आली.

**पुन्हा मंदावली होती वाहतूक**

टँकर हटवल्यानंतर घाट विभागातील वाहतूक हळूहळू सुरळीत झाली. मात्र काही अवजड वाहने अडकून पडल्याने काही काळ वाहतूक संथ होती. काही तासांत परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आली, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. गुरुवारी सकाळी ७.३० च्या सुमारास अमृतांजन पुलाजवळील घाटाच्या पट्ट्यात काही अवजड वाहने बंद पडल्यामुळे वाहतूक काही काळासाठी मंदावली होती, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, महामार्ग पोलीस आणि टरफळ्ळ यांनी संयुक्तपणे हे काम केले.

### मध्य रेल्वेचा मोठा निर्णय, आता लोकल उशिरा धावणार नाही
### प्रवाशांना मोठा दिलासा, काय आहे नवा प्लॅन?

**पीक अवर्समध्ये एक्सप्रेसला उपनगराबाहेरच थांबा**

अशातच आता या सर्व गोष्टींचा विचार करून या समस्येवर उपाय म्हणून मध्य रेल्वेने मोठा निर्णय घेतला आहे. पीक अवर्सदरम्यान लांब पल्ल्याच्या मेल/एक्सप्रेस गाड्यांना थेट मुंबई उपनगरात प्रवेश करू दिला जाणार नाही. या गाड्यांना टिटवाळा, आसनगावसारख्या स्थानकांपूर्वीच थांबवण्यात येणार आहे. टिटवाळा आणि आसनगाव येथून दररोज सीएसएमटी, दादर, कल्याण दिशेने अनेक लोकल गाड्या सुटतात. मात्र याच मार्गावरून उत्तरेकडून येणाऱ्या एक्सप्रेस गाड्या आल्याने लोकल सेवेत अडथळे निर्माण होतात. नव्या निर्णयामुळे एक्सप्रेस गाड्यांचा लोकलच्या वेळापत्रकावर होणारा परिणाम टाळता येणार आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

मध्य रेल्वेच्या कल्याण-ठाणे-सीएसएमटी या अत्यंत गर्दीच्या मार्गावर दररोज पीक अवर्सदरम्यान प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. सकाळी ऑफिसच्या वेळेत लोकल गाड्या जर थोड्याही उशिराने धावल्या तर त्यानंतरची परिस्थिती ही आणखी बिकट होते. मात्र आता मध्य रेल्वे प्रशासनाने या गंभीर समस्येवर महत्त्वाचा आणि गेमचेंजर ठरणारा निर्णय घेतला आहे. ज्यामुळे सकाळच्या वेळेत लोकल सेवा अधिक शिस्तबद्ध आणि वेळेवर होण्याची शक्यता आहे. उत्तर भारतातून येणाऱ्या लांब पल्ल्याच्या मेल आणि एक्सप्रेस गाड्यांच्या वेळापत्रकाचा थेट परिणाम अनेकदा मध्य रेल्वेच्या उपनगरीय लोकल सेवेवर होताना दिसतो.



त्यामुळे एखादी एक्सप्रेस गाडी उपनगरातील स्थानकाजवळून जात असताना सुरक्षिततेच्या कारणास्तव लोकल गाड्यांना सिग्नलवर थांबवावे लागते. त्यामुळे अनेकदा लोकल या उशिराने धावतात. याचा सर्वाधिक फटका सकाळी कामावर जाणाऱ्या नोकरदार वगार्ला बसतो. लोकल उशिराने आल्यामुळे डब्यांमध्ये प्रचंड गर्दी होते आणि प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अनेक वेळा लोकल २० ते २५ मिनिटे उशिराने धावल्याने संपूर्ण वेळापत्रक कोलमडते.

### मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेनंतर आता मुंबई-नाशिक महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी
## ठाण्याजवळ अवजड वाहनाचा अपघात

**नागरिकांचा संताप**

विशेष म्हणजे, याआधी मुंबईझ्रपुणे द्रुतगती मार्गावर ३२ तास चाललेली वाहतूक कोंडी ताजी असतानाच हा प्रकार घडल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. मुंबईझ्र नाशिक महामार्ग सध्या चार लेनवरून आठ लेनपर्यंत रुंदीकरणाच्या कामातून जात असून, बांधकाम आणि अवजड वाहनांची वर्दळ यामुळे हा मार्ग सतत ‘डोकेदुखी’ ठरत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.



■ठाणे। प्रतिनिधी,

मुंबईझ्रपुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक पूर्ववत होत नाही तोच आता मुंबई-नाशिक महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. मुंबईझ्रनाशिक महामार्गावर ठाण्यातील रुस्तमजी कॉम्प्लेक्सजवळ एका मोठ्या मालवाहू ट्रकचा अपघात झाल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर हा अपघात झाल्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला आहे. अवजड ट्रक बाजूला काढण्यासाठी प्रशासनाला मोठी कसरत करावी लागत आहे.

माहितीनुसार, गुरुवारी पहाटेच्या सुमारास अवजड मालवाहू ट्रकचा रुस्तमजी संकुलासमोर अपघात झाला. ट्रक महामार्गावरच मधोमध आडवा झाल्यामुळे वाहतूक मंदावली. रुस्तमजी संकुलासमोर कोंडीमुळे मोठा ‘बॉटलनेक’ तयार झाल्याने माजिवडा जंक्शनपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. या अपघाताचा सर्वाधिक फटका नाशिक आणि भिवंडीहून मुंबईकडे येणाऱ्या वाहनचालकांना बसत आहे.

**प्रवास टाळावा, पर्यायी मार्गांचा वापर करावा - पोलिसांचे आवाहन**

ठाणे वाहतूक पोलीस घटनास्थळी तैनात असून अपघातग्रस्त वाहन हटवण्याचे काम सुरू आहे. ट्रक बाजूला केल्यानंतर वाहतूक हळूहळू पूर्वपदावर आणली जाईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. तोपर्यंत नागरिकांनी या मार्गावरून प्रवास टाळावा आणि घोडबंदर मार्ग किंवा ठाणे शहरातील अंतर्गत रस्त्यांचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

वारंवार होणारे अपघात आणि तासन्तास चालणारी वाहतूक कोंडी पाहता, या मार्गावरील सुरक्षितता आणि नियोजनावर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### आई गावाला गेली अन् इकडं बापाने १४ वर्षांच्या मुलीवर केला बलात्कार

■मुंबई। प्रतिनिधी,

मुलगी आणि बापाच्या पवित्र नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीने स्वतःच्या वडिलांवर लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप केले आहेत. आई गावाला गेल्याचा फायदा बापाने घेतला. तक्रार मिळताच पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपी बापाला बेड्या ठोकल्या आहेत. दिल्लीच्या पहाडगंज भागातील ही घटना आहे. पीडित मुलगी आठवीत शिकत आहे. तिची आई काही कामानिमित्त १५ दिवसांपासून बिहारला गेली होती. याचा फायदा घेत सैतान बापाने डाव साधला. ३१ जानेवारीच्या रात्री पीडिता, तिची धाकटी बहीण आणि बापासोबत झोपली होती. तेव्हा सैतान बापाने तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. पीडितेने विरोध केला असता बापाने तिला जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेने पोलिसांसमोर अत्यंत धक्कादायक खुलासा केला आहे. गेल्या १०-१५ दिवसांत तिच्यासोबत ४ ते ५ वेळा अशा प्रकारची घटना घडली होती. वडील तिला आणि तिच्या आईला आधीही अमानुषपणे मारहाण करायचे, त्यामुळे ती भीतीने गप्प होती. मात्र आता तिला आपल्या धाकट्या बहिणीच्या सुरक्षेची चिंता वाटू लागल्याने तिने हिंमतीने पोलिसांना सर्व सत्य सांगितले.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार
### नंतर बळजबरीनं धर्मांतर करून लग्न




**मुलीवर आधी अत्याचार, नंतर...**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून त्यानंतर बळजबरीनं धर्मांतर करून लग्न केल्याची धक्कादायक घटना सोलापूर शहरात घडली असून इथं वकिलासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोलापुरातल्या विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला असून, त्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे.

■डहाणू। प्रतिनिधी,

पुरोगामी महाराष्ट्र अशी ज्या राज्याची ओळख करून दिली जाते, त्याच महाराष्ट्रात महिला सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर असून दिवसागणिक ही परिस्थिती आणखी वाईटच होत चालली आहे. नुकत्याच घडलेल्या एका घटनेमुळं पुन्हा एकदा महाराष्ट्रात कायद्याची भीती कोणाला राहिली आहे की नाही, हाच प्रश्न उपस्थित केला जात आहे.

इजराईल शेख, उजेब शेख, ॲड. अब्दुल्ला खतीब असं अटक केलेल्या आरोपींचं नाव असून इतर दोन आरोपी अद्याप फरार आहेत अशी माहिती आहे. आरोपी इजराईल शेख हा पीडित अल्पवयीन मुलीचा सतत पाठलाग करत होता. डिसेंबर २०२४ मध्ये त्याने पीडितेचे फोटो आणि विडिओ मिळवत तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. त्यानंतर मित्र उजेब शेख याच्या घरी नेऊन तिच्यावर अत्याचार केले. डिसेंबर २०२५ मध्ये पीडित मुलीला आरोपी इजराईलनं लग्नाचं आमिष दाखवत तिला शहर काझी कार्यालयात नेलं.

काझी कार्यालयात ॲड. अब्दुल्ला खतीबनं लग्नासाठी धर्मांतर गरजेचं असल्याचं सांगत काही कागदपत्रांवर तिची सही घेतली. जबरदस्तीने धर्मांतर करत तिचं लग्न लावत या मुलीशी लग्न लावण्यात आलं आणि यानंतर तिला काही महिने कर्नाटकातील कलबुर्गी इथं ठेवण्यात आलं. त्या ठिकाणी आरोपीचे आतेभाऊ आणि त्याच्या आईनं पीडितेला मारहाण केली, उपाशी ठेवून छळ केला. खुद्द पीडितेनंच आपल्या तक्रारीत घडला प्रकार सांगितल्याची माहिती आहे. तिच्या तक्रारीनंतर सोलापुरातील विजापूर रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यातील तिघांना अटक करण्यात आली आहे.

## मुंबईत २० वर्षीय अपंग मुलीवर लैंगिक अत्याचार... ५ महिन्यांची गर्भवती राहिली अन्... बापाला अटक

कफ परेड परिसरात एका २० वर्षीय दिव्यांग तरुणीसोबत तिच्या ५० वर्षीय वडिलांनी घृणास्पद कृत्य केल्याचं वृत्त आहे. या प्रकरणात कफ परेड पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्यावर आपल्याच मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

दक्षिण मुंबईतून अतिशय संतापजनक आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. येथील कफ परेड परिसरात एका २० वर्षीय दिव्यांग तरुणीसोबत तिच्या ५० वर्षीय वडिलांनी घृणास्पद कृत्य केल्याचं वृत्त आहे. या प्रकरणात कफ परेड पोलिसांनी आरोपीला अटक केली असून त्याच्यावर आपल्याच मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप आहेत. प्रकरणातील पीडिता ही ती मानसिकदृष्ट्या विकलांग असून तिला बोलता किंवा ऐकता येत नाही. धक्कादायक बाब म्हणजेच तपासादरम्यान, ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचं उघडकीस आलं. डीएनए चाचणीच्या रिपोर्ट्सनंतर, या प्रकरणाचा अलगडा झाला.

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडितेने हातवारे करून पोटात विचित्र वेदना होत असल्याचं तिच्या आजीला सांगितलं होतं.

**शारीरिकदृष्ट्या अपंग तरुणीचं लैंगिक शोषण**

मुलीच्या तक्रारीच्या आधारे, पोलिसांनी भारतीय दंड संहिताच्या गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला. त्यामध्ये मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या अपंग तरुणीचं लैंगिक शोषण तसेच, जबाब देण्यास असमर्थ असलेल्या मुलीवर बलात्कार यासंबंधी कलमांचा समावेश होता. पोलिसांच्या माहितीनुसार, २१ मार्च ते २१ सप्टेंबर २०२५ दरम्यान ही घटना घडली आणि २२ सप्टेंबर २०२५ रोजी या प्रकरणाचा एफआयआर दाखल करण्यात आला.

त्यानंतर, कुटुंबियांनी तिला तातडीने रुग्णालयात नेलं आणि मेडिकल टेस्टनंतर डॉक्टरांनी पीडिता ५ महिन्यांची गर्भवती असल्याचं सांगितलं. ही धक्कादायक बाब समोर आल्यानंतर, रुग्णालयाच्या प्रशासनाने तात्काळ कफ परेड पोलिसांना याची माहिती दिली.

**वडिलांनी पोलिसांना काय सांगितलं?**

चौकशीदरम्यान, पीडिता तिच्या अपंगत्वामुळे स्पष्ट जबाब देण्याच्या स्थितीत नव्हती. दरम्यान, तिच्या वडिलांनी सांगितलं की त्यांची मुलगी लहानपणापासूनच मानसिकदृष्ट्या अपंग आहे आणि तिच्यासोबत कोणत्याही प्रकरचा लैंगिक अत्याचार झाला नाही. तसेच, त्यांचं कुटुंब सुद्धा याबाबत कोणतीही तक्रार दाखल करणार नसल्याचं देखील ते म्हणाले. मात्र, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरूच ठेवला आणि पीडितेच्या काउन्सलिंगमध्ये तिने अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल करण्यासाठी संमती दिली.





## गुंगीचे औषध देऊन ब्लू फिल्म बनवली, अपलोडही केली, महिलेची तक्रार

■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरारोड पूर्वेच्या काशीमिरा पोलीस ठाण्यापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या मिरा गावठाण येथील महाविष्णू मंदिराचा भाग असलेल्या सोना लॉजिंग उर्फ एस.के. रेसिडंसीमध्ये गुंगीचे औषध देऊन ३२ वर्षीय महिलेवर बलात्कार करत पॉर्न व्हिडीओ चित्रीत करून विविध साईटवर अपलोड केल्याप्रकरणी काशीमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेच्या महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाच्या पोलीस निरीक्षक शीतल मुंढे या करत आहेत. तर सदरील लॉजमध्ये चित्रीकरण केलेले पॉर्न व्हिडीओ हे आतापर्यंत १ कोटी ३५ लाख लोकांनी पाहिलेला आहे. तसेच सदरील लॉजिंगमध्ये विना ओळखपत्र किंवा दप्तरी नोंद न-करता रूम्स दिल्याचे सुद्धा पीडित तक्रार महिलेने सांगितले आहे. तक्रारीनुसार, काशीमिरा पोलीस ठाणे हद्दीत हाकेच्या अंतरावर असलेल्या महाराष्ट्र शासनाच्या जागेवर २०१८ साली बेकायदा बांधकाम करुन सदरील जागा कब्जा करत त्याठिकाणी २२ रूम्सचे बांधकाम करण्यात आलेले आहे. तसेच त्या सरकारी जागेचा खरेदी विक्री व्यवहार सुद्धा करण्यात आला आहे. त्यावर पालिकेच्या मार्फत तोडक कारवाई सुद्धा करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा बांधकाम करून त्याठिकाणी लॉजिंग चालू करण्यात आले आहे. त्याच जागेवर रीलस्टार यांना रिल्स व पॉडकॉस्ट, ड्रामा, सिरीयल बनविण्याच्या नावाखाली गुंगीचे औषध देऊन बलात्कार करत अत्याचार केल्याचा घटनेने खळबळ उडाली आहे. तर नराधमांनी तेवढ्यावरच न-थांबता सदरील पीडित महिलेचे पॉर्न व्हिडीओ चित्रीत केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पीडित तरुणीच्या तक्रारीनंतर आरोपी ललित मोदी, हनी पासवान, आकाश देसाई, प्रीती पुनीत कौर व अनिकेत पाटोळे आणि कॅमेरामन विरु यांच्यासह अन्य सहकार्यांविरोधात काशीमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी सहा जणांहून अधिकांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित तरुणीचा आरोप आहे की, तिला गुंगीकारक पदार्थ प्यायला देऊन तिच्या संमतीशिवाय बलात्कार करत गैरप्रकार करण्यात आला आहे. तसेच तिचे पॉर्न व्हिडीओ चित्रीकरण करून ते विविध अश्लिल वेबसाईट्सवर अपलोड करण्यात आले. व्हिडीओ हटवण्याची मागणी केल्यानंतर तिला जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. संपूर्ण प्रकार हा पीडित तरुणीने सामाजिक कार्यकर्ते डॉ. बिनु वर्गीस यांच्या निदर्शनास आणून दिला होता.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ही राजकीय परिपक्वता आहे...



जागतिक राजकारणात मनमानीपणा आणि आततायीपणा इतरांवर दबाव आणण्यापुरता ठीक असतो; पण प्रत्यक्षात निर्णय हे वास्तवाच्या गणितावरच घ्यावे लागतात. अमेरिकेने आडमुठेपणाचे धोरण सोडून भारताशी केलेला करार हे त्याचे ठळक उदाहरण आहे. गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असलेला दोन्ही देशांतील करार पूर्णत्वास गेला. यासह अमेरिकेने भारतावर आकसापोटी लादलेला ५० टक्के करही न्यून करून १८ टक्क्यांवर आणला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी सामाजिक माध्यमांत याची घोषणा केली आणि त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही याविषयी माहिती दिली; मात्र या कराराच्या आर्थिक परिणामांपेक्षा त्यावरून आपल्याकडे होत असलेले राजकीय आरोप-प्रत्यारोप अधिक गाजत आहेत. यावरून 'सरकार अमेरिकेसमोर झुकले', असा आरोप काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी केला आहे. तथापि या घटनेकडे विरोधी पक्ष केवळ एकाच अंगाने पहात आहेत. अमेरिकेने साधारण ६ महिन्यांपूर्वी भारतावर आकसापोटी ५० टक्के कर लादला. रशियाकडून स्वस्त मिळणारे तेल भारत खरेदी करू लागल्याने ट्रम्प यांनी भारतावर उगवलेला तो सूड होता. त्यास भारताने आजपर्यंत जुमानले नाही. मग तेव्हा विरोधकांनी 'सरकारने अमेरिकेला झुकवले', असे म्हटले का? असो. अमेरिकेने हा अवास्तव कर लादल्यापासून ते हा करार अस्तित्वात येण्याच्या अगदी आदल्या दिवसापर्यंत ट्रम्प यांनी कधी वेगवेगळी विधाने करून, कधी विसंगत विधाने करून, तर कधी थेट धमकी देऊन भारतावर दबाव आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. भारताने ट्रम्प यांच्या बडबडीकडे दुर्लक्ष करत स्वतःचे काम चालू ठेवले. भारताने अलीकडच्या कालावधीत ९ मोठे आंतरराष्ट्रीय करार केले. त्यात 'मदर ऑफ ऑल डील्स' हा युरोपीयन युनियनसमवेत केलेला करार ट्रम्प यांची झोप उडवणारा ठरला. इतकेच नव्हे, तर हा करार होण्याच्या काही महिन्यांपूर्वी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचे एका कार्यक्रमात एकत्रित हात उंचावलेले छायाचित्रही ट्रम्प यांना चांगलेच झोंबले होते. या दोन्ही गोष्टींमुळे अमेरिकेचे धाबे दणाणले. भारत अमेरिकेसमोर झुकण्याऐवजी व्यापारासाठी अन्य पर्याय शोधत आहे, हे अमेरिकेला कळून चुकले. 'असे झाल्यास आधीच कोसळण्याकडे घोडदौड करणारी अमेरिकेची अर्थव्यवस्था अधिक खिळखिळी होईल', हेही अमेरिकेने जाणले. आपलाही तो उद्देश होताच. त्यामुळे एकप्रकारे भारत नव्हे, तर ट्रम्प झुकले, असे चित्र आजतरी निर्माण झाले आहे. वस्तूतः अमेरिकेशी व्यापार करणे, ही भारताचीही आवश्यकता आहे; पण ट्रम्प यांचा 'ही आवश्यकता भारताची अपरिहार्यता आहे', असा समज झाला, तो सरकारने दूर केला इतकेच! दोन्ही देशांत करार झाल्यानंतर सरकारने या करारातील सर्व तपशील अद्याप उघड केलेला नाही, ही वस्तूस्थिती आहे. तो उघड करण्याची मागणी करणे किंवा सरकारवर अन्यही आरोप करणे, ही विरोधकांची संसदीय आयुधे आहेत, ती त्यांनी वापरली, हे ठीक आहे. आक्षेप या घटनेचे निमित्त करून आगीत 'तेल' ओतण्यावर आहे. 'पंतप्रधानांनी देशाच्या सन्मानाशी सौदा केला', असे बोचरे आणि तथ्यहीन आरोप मनातील खदखद प्रकट करत असतात, याचे भान विरोधकांना उरलेले दिसत नाही. कुठल्याही घटनेत राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन देशहिताच्या दृष्टीने पहायला आपले लोकप्रतिनिधी कधी शिकणार? दुसरीकडे सरकारनेही कुठलाही संभ्रम ठेवता कामा नये. खरेतर सरकारने 'या प्रकरणी लवकरच दोन्ही देश एकत्रितपणे या कराराविषयी सांगतील', असे स्पष्ट केले आहे. हा संपूर्ण करार जनतेसमोर येईल तेव्हा येईल; पण विरोधकांनी 'सरकारने अमेरिकेसाठी भारतीय कृषी बाजारपेठ उघडी केल्याने अमेरिकेचा माल भारतात स्वस्तात मिळेल आणि पर्यायाने भारतीय शेतकऱ्यांची हानी होईल', ही निर्माण केलेली भीती दूर करण्याचे काम सरकारचे आहे. 'सरकार झुकले नाही, तर विरोधक चुकले', हे सरकारने दाखवून द्यायला हवे. आज 'सरकार झुकले' असा आरोप काँग्रेस करत आहे. तथापि याच काँग्रेसच्या राजवटीत अमेरिकेने डोळे वटारले की, धोरणे पालटली जात होती. तेव्हा काँग्रेस झुकली नव्हती का? इतकेच नव्हे, तर आज जी काँग्रेस शेतर्कयांचा कैवार घेतल्याचे सोंग करत आहे, तिच्या सत्तेच्या ६ दशकांहून अधिकच्या कार्यकाळात लाखो शेतकरी देशोधडीला लागले, त्याचे काय? शेतर्कयांविषयी बोलण्यापूर्वी काँग्रेसने एकदा तरी स्वतःच्या सत्ताकाळातील कृषी धोरणांचा हिशोब देशासमोर मांडावा. स्वातंत्र्यानंतरच्या काळापासूनच जर वेळोवेळी शेतर्कयांचे हित साधले असते, तर शेतर्कयांची आज अशी दयनीय स्थिती झाली नसती. विरोध करतांना किमान काही गोष्टींचे भान राखणे आवश्यक आहे. भारत-अमेरिका करारावरून अमेरिकेतील 'न्यूज वीक'ने प्रसिद्ध केलेली बातमीही भारताच्या बाजूने झुकणारी आहे. 'ट्रम्प यांच्या प्रथम पापण्या लवल्या आणि त्यास भारतानेही प्रतिसाद दिला', असा त्या बातमीचा आशय आहे. त्यामुळे ज्या देशाशी करार झाला, तेथेसुद्धा भारताची ठाम भूमिका स्वीकारली जात असतांना भारतातील विरोधी पक्ष मात्र सरकारवर आसुड ओढण्यात धन्यता मानत आहेत, हे विरोधाभासी चित्र आहे. आजमितीस भारत आणि अमेरिका यांच्यात साधारण १२ लाख कोटी रुपयांचा व्यापार होतो. त्यांपैकी भारत अमेरिकेला साधारण ८ लाख कोटी रुपयांचे साहित्य विकतो, तर अमेरिकेकडून साधारण ४ लाख कोटी रुपयांचे साहित्य खरेदी करतो. या करारात भारताला साधारण ४ लाख कोटी रुपयांचा लाभ होत आहे. अशात ट्रम्प यांनी भारतावरील कर ५० टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आणला, म्हणजे झुकले कोण? अर्थात् भारताने रशियाकडील तेलखरेदी थांबवली कि नाही?, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईलच; पण तोपर्यंत संयम राखणे, ही राजकीय परिपक्वता आहे. एक मात्र निश्चित की, अमेरिका आणि त्यातही ट्रम्प यांच्यासारख्या सणकी व्यक्तीसमवेत जुळवून घेत आपले व्यापारहित साधणे, ही मोठी कसरत आहे. अनेक देशांना ती जमलेले नाही. ट्रम्प यांना त्यांच्याच भाषेत समजावावे लागते. जागतिक राजकारणात जो देश पर्याय निर्माण करतो, तोच सन्मानाने जगू शकतो. या करारातून भारताने तेच करून दाखवले आहे. लोकप्रतिनिधींनी राष्ट्राशी निगडित विषयांकडे राजकीय चष्म्यातून न पहाता राष्ट्रहिताच्या दृष्टीने पाहिल्यास आपोआपच राष्ट्रहित साधले जाईल.

# वाहतूक कोंडीचा 'एक्स्प्रेस' मार्ग



मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे म्हणजे वाहतुकीचा अखंड कोसळणारा धबधबा आहे. मुंबई ते पुणे अवघ्या तीन तासांवर आणण्याचे संपूर्ण श्रेय या एक्स्प्रेस वेला जाते. पण मंगळवारच्या दुर्घटनेनंतर हा प्रवास ३ तासांऐवजी ३० तासांचा झाल्याने विकासाचे कसे तीनतेरा झाले आहेत, ही बाब ठळकपणे समोर आली आहे. मंगळवारी ३ फेब्रवारी रोजी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास खंडाळा घाटामधील आडोशी बोगद्याजवळ रसायन वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात होतो आणि टँकर पलटी होतो आणि तेव्हापासून पुण्याहून मुंबईच्या दिशेची वाहतूक ठप्प होते. याकडे कुणीही गांभीयार्ने न पाहिल्याने तब्बल २५ किलोमीटर लांबीची वाहनांची रांग लागणे, हजारो लोकांचा खोळंबा होणे याला जबाबदार कोण, याचे उत्तर महाराष्ट्राला मिळायला हवे. तसेच ३० तासांनंतरही वाहतूक सुरळीत होऊ शकली नाही हे अपयश कुणाचे, असा गंभीर प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. मुंबई-पुणे महामार्गावर अनेकदा वाहतूक कोंडी होते. कधी १०-१५ मिनिटे तर कधी तास-दीडतास. मात्र, मंगळवार संध्याकाळपासून ठप्प झालेली वाहतूक संथगतीने सुरू व्हायला २४ तास लागत असतील तर वाहतूक व्यवस्थापनाबाबत सरकार किती बेफिकीर आहे, हे दाहक वास्तव समोर येते.

या महामार्गावर अपघात, गाड्या पलटी होणे हे काही नवीन नाही. मात्र, त्यावर तातडीने उपाययोजना होणेही गरजेचे आहे. अपघातानंतर गाड्या जागेवरून हलवून वाहतूक सुरळीत केली जाते. तरीही दीड-दोन तासांचा खोळंबा होतोच मात्र, ३० तासांनंतरही वाहतूक पूर्ववत होत नसेल तर सरकारने वाहतूक (ट्रान्सपोर्टेशन) धोरण चुकल्याचे मान्य करून तातडीने चूक दुरुस्त करायला हवी. सर्वात गंभीर बाब म्हणजे टँकर पलटल्यानंतर त्याची दखल तातडीने घेतली गेली नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी होत गेली. बरं दखल घेतल्यानंतर उपाययोजना काय करणार हा प्रश्नच होता. रसायन हवेत पसरते तेव्हा त्यावर काय उपाययोजना करावी, याची महामागार्चे व्यवस्थापन करर्णाया कंपनीकडे तजवीज नाही, हीच आश्चर्याची बाब आहे. त्यामुळे भरमसाठ टोल आकारून पश्चाताप करावा लागतो, ही हजारो प्रवाशांची संतप्त प्रतिक्रिया खूप काही सांगून जाते. बेफिकीरीचा सर्वात उत्तम नमुना म्हणजे अशी दुर्घटना घडली तर याची माहिती प्रवाशांपर्यंत आणि वाहनचालकांपर्यंत पोहोचवण्याची कोणतीही सोय नाही. त्यामुळे वाहने येतच होती आणि वाहतूक कोंडीत भर टाकत होती. त्यामुळे वाहनांची २०-२५ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या होत्या.

वास्तविक अत्याधुनिक वाहतूक व्यवस्थेची चर्चा होत असताना या बाबींचा विचार व्हायला हवा. मात्र, रस्ता बांधला, टोल वसुली सुरू झाली की सगळे झाले, हीच आपली विकासाची व्याख्या ठरली आहे. या वाहतूक कोंडीत हजारो लोकांची किती गैरसोय झाली याचा सरकारने विचार केला आहे का? त्यांना अन्नपाण्यावाचून राहावे लागले, लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांच्या वाट्याला काय आले, याचा विचार तरी सरकारने केला का? वाहतूक कोंडीत अडकलेल्या महिला, ज्येष्ठांचे शौचालयाशिवाय किती हाल झाले असतील, वाहनचालक झोपू शकत नाही आणि गाडी सोडू शकत नाही त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा किती ताण त्यांच्यावर पडला असेल, याची जाणीव सरकारला आहे का? एवढंच नाही तर चालक सीट सोडून जाऊ शकत नव्हता त्यामुळे त्याचेही किती शारीरिक हाल झाले असतील, याचा विचार केला तरी त्रास होईल. मात्र, सरकारला याची जाणीव आहे का, हाच खरा प्रश्न आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सायंकाळी उशिरा या घटनेची दखल घेत याबाबत चौकशीचे आदेश दिल्याचे समजते. तर, बुधवारी सायंकाळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील याबाबत गंभीर दखल घेत आपत्कालीन परिस्थितीत वाहतूक आराखडा तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. बाकीच्या नेत्यांना तर महामार्ग सुरू आहे की बंद आहे, याविषयी काहीही देणेघेणे नव्हते. त्यामुळे बुधवारी सकाळी वाहनांच्या रांगा पाहून संपूर्ण महाराष्ट्राला या घटनेचे गांभीर्य कळले.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे हा मुंबई-पुण्याला जोडणारा तसेच पश्चिम महाराष्ट्रासह दक्षिण भारताला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. आधीच्या मुंबई-पुणे महामार्गाच्या खंडाळा घाटातून नागमोडी प्रवासाला चार ते सहा तास लागायचे. मात्र, एक्स्प्रेस वेमुळे हा प्रवास अडीच ते तीन तासांवर आला. मात्र, मंगळवारसारखी दुर्घटना झाल्यास त्या कठीण प्रसंगातून मार्ग कसा काढायचा याचा विचारच करण्यात आलेला नाही, ही बाब या निमित्ताने उघड झाली आहे. वास्तविक रसायनाचा टँकर उलटल्यामुळे आणि त्यातून रसायन हवेत मिसळत असल्याने ते घातक होते. त्यामुळे दोन्ही बाजूंची वाहतूक आधीच इतर मागार्ने वळवायला हवी होती. त्यासाठी संपूर्ण एक्स्प्रेस वेवरील पोलिसांना अलर्ट करायला हवे होते. त्याचवेळी वाहनचालकांना अशा घटनांची माहिती मिळेल आणि पयार्यी मागार्चा अवलंब करतील, अशी व्यवस्था हवी. ही जबाबदारी टोल वसुली करर्णाया आयआरबी कंपनीची होती. मात्र, आपल्याकडील वाहतूक व्यवस्थापन प्रचंड ढिसाळ आणि सर्वात दुर्लक्षित आहे. वाहतुकीचा प्रचंड गोंधळ सुरू असतानाही कंपनीकडून टोलवसुली सुरू होती. एकूणच आपल्याकडील वाहतूक व्यवस्थेचा पुरता बँड वाजल्याचे मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील दुर्घटनेने दाखवून दिले आहे. यातून धडा घ्यायचा की थातूरमातूर कारणे सांगून वेळ मारून न्यायची, याचा निर्णय सरकारने घ्यायचा आहे.

# भारत-अमेरिकेतील अस्पष्ट व्यापार करार



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीनुसार भारतावरील टॅरिफ कपातीची घोषणा करतानाच भारत-अमेरिकेत द्विपक्षीय व्यापार करार झाल्याचं परस्पर जाहीर करून टाकलंय. ट्रम्प यांच्या एकतर्फी घोषणेमुळं देशात गोंधळाचं वातावरण आहे. भारत यापुढं रशियाकडून कच्चं तेल खरेदी करणार नाही, इथपासून ते भारतानं अमेरिकेसाठी कृषी क्षेत्र खुलं करून दिल्यापर्यंतचे अनेक दावे ट्रम्प आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेत. भारताकडून या दाव्यांचं खंडन करण्यात आलं असलं, तरी अद्याप अनेक प्रश्न अनुत्तरीत आहेत. जोपर्यंत या व्यापार करारातील तरतुदी व वाटाघाटी प्रत्यक्ष कागदावर उतरत नाही तोपर्यंत यातील अस्पष्टता दूर होणार नाही.

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असतानाच नवी दिल्लीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (एनडीए) घटक पक्षांची बैठक झाली. या बैठकीत भारत-अमेरिकेत यशस्वी द्विपक्षीय व्यापार करार केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. हा सत्कार होत असतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या दबावाखाली देश विकल्याचा आरोप करत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी व विरोधकांनी त्यांना धारेवर धरलंय. या सर्व गोंधळाला सुरुवात झाली ती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अचानक येऊन धडकलेल्या एका सोशल मीडिया पोस्टमुळं. डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रूथ सोशल मीडियावर परवा एक पोस्ट टाकली. या पोस्टमधून त्यांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या दूरध्वनी संभाषणानंतर भारतावरील टॅरिफ कपातीची घोषणा केली. सोबतच आपल्या नेहमीच्या शैलीत भारत आता रशियाकडून कच्चं तेल खरेदी करण्याचं थांबवून अमेरिका/व्हेनेझुएलाकडून कच्चं तेल खरेदी करेल, असा एकतर्फी दावाही केला.

आम्ही व्यापार आणि रशिया-युक्रेनमधील युद्ध संपवण्यासह अनेक विषयांवर चर्चा केली. भारतानं रशियाकडून कच्चं तेल विकत घेणं थांबवल्यास युक्रेनमधील युद्ध संपण्यास मदत होईल. या युद्धामुळं दर आठवड्याला हजारो लोक मरत आहेत. पंतप्रधान मोदी यांच्याशी असलेली मैत्री आणि आदरापोटी तसंच त्यांच्या विनंतीनुसार आम्ही त्वरित प्रभावानं अमेरिका-भारत यांच्यात एका व्यापार करारावर सहमती दर्शवल्याचं डोनाल्ड ट्रम्प यांनी या पोस्टमध्ये नमूद केलं. या व्यापार करारांतर्गत अमेरिका भारतावरील परस्पर आयात शुल्क (रेसिप्रोकल टॅरिफ) कमी करून ते २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत खाली आणेल. त्याचप्रमाणं भारत अमेरिकेवरील शुल्क कमी करून शून्यावर आणण्यासाठी पुढं पाऊल टाकेल. एवढंच नाही, तर भारताच्या पंतप्रधानांनी ५०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीची अमेरिकन ऊर्जा, तंत्रज्ञान, कृषी, कोळसा आणि इतर अनेक उत्पादने खरेदी करण्यासह बाय अमेरिकन मोहिमेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर इतर वस्तू खरेदी करण्याची वचनबद्धता दर्शवल्याचा दावाही ट्रम्प यांनी केला.

या पोस्टवर प्रतिक्रिया देताना पंतप्रधान मोदींनी टॅरिफ कपातीबद्दल ट्रम्प यांचे आभार मानले. परंतु त्यांच्या कुठल्याही दाव्याची पुष्टी केली नाही. तर, पाठोपाठ अमेरिकेच्या कृषि सचिव ब्रुक रोलिन्स यांनी हा करार अमेरिकन शेतर्कयांसाठी खूपच फायदेशीर ठरेल, असं सांगितलं. कारण यामुळं अमेरिकन कृषि उत्पादनांना भारतातील मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल. त्यांना भारतात अधिक कृषि उत्पादनांची निर्यात करता येईल, असा दावा रोलिन्स यांनी केला. यानंतर डोनाल्ड ट्रम्प आणि ब्रुक रोलिन्स यांच्या पोस्टवर देशभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या. भारत-अमेरिकेतला व्यापार करार मागच्या वर्षभरापासून रखडण्यामागचं कारणंच कृषि, दुग्ध व मत्स्यव्यवसाय क्षेत्र होतं. अमेरिकेच्या प्रचंड दबावानंतरही भारत अमेरिकन कंपन्यांना आपलं हे क्षेत्र खुलं करून देण्यास तयार नव्हता. यामागचं कारण म्हणजे भारतात आजही ७० टक्क्यांहून अधिक जनता ही कृषिआधारित व्यवसायांवर उदरनिर्वाह करते. अल्पभूधारक शेतकरी, पशुपालन-दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसायावर अवलंबून असर्णायांची संख्या मोठी आणि उत्पन्न मर्यादित अशी भारतातील परिस्थिती आहे.

अशावेळी दजेर्दार परदेशी कृषि, दुग्ध उत्पादने भारतात दाखल झाल्यास स्पर्धात्मकता वाढून भारतीय उत्पादकांना त्याचा मोठा फटका बसू शकतो, या जाणीवेतून आतापर्यंत भारतानं हे क्षेत्र संरक्षित ठेवलंय. मग अचानक भारतानं माघार कशी घेतली? असे प्रश्न अमेरिकेच्या दाव्यांमुळे उपस्थित झालेत. ट्रम्प यांच्या पोस्टनंतर दुसऱ्या दिवशी भारताचे वाणिज्य व व्यापारमंत्री पीयूष गोयल यांनी तातडीने पत्रकार परिषद घेत भारत-अमेरिकेत व्यापार करार होत असल्याचं मान्य केलं. परंतु कृषि, दुग्ध क्षेत्र संरक्षितच असून भारतानं अमेरिकेसोबत कुठलीही तडजोड केली नसल्याची ग्वाही दिली. या करारावर अंतिम संमती होऊन तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भारत-अमेरिका व्यापार करारावर संयुक्त निवेदन प्रसिद्ध करतील, अशी माहितीही गोयल यांनी दिली. कुठल्याही व्यापार कराराची घोषणा झाल्यानंतर त्याचा संक्षिप्त तपशील समोर येत असला, तरी परस्पर शुल्क, गुंतवणूक, सवलती आदी वाटाघाटीतील बारीक तपशील कागदावर प्रत्यक्ष उमटण्यास साधारण वर्ष ते दोन वर्षांचा कालावधी लागतो. भारत-अमेरिकेतील हा संक्षिप्त तपशीलही अद्याप समोर न आल्यानं गोंधळ कायम आहे. त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे भारतावरील घटलेला टॅरिफ.

साधारण वर्षभरापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील इतर देशांसह भारतावर मार्च २०२५ पासून रेसिप्रोकल टॅरिफ लावायला सुरुवात केली होती. जुलैमध्ये हा टॅरिफ २५ टक्के करून ऑगस्ट २०२५ मध्ये रशियाकडून कच्चं तेल विकत घेत असल्याबद्दल शिक्षा म्हणून आणखी २५ टक्के असा एकूण ५० टक्के टॅरिफ ट्रम्प यांनी भारतावर लादला होता. २०२४ मध्ये भारत-अमेरिकेत एकूण २१३.३ अब्ज डॉलरचा व्यापार झाला होता. यामध्ये १२८.९ अब्ज डॉलरच्या वस्तू आणि ८३.४ अब्ज डॉलरच्या सेवांचा समावेश होता. मात्र, टॅरिफनंतर भारतीय निर्यातदारांना त्याचा मोठा फटका बसला. जानेवारी-नोव्हेंबर २०२५ या काळात अमेरिकेला होणारी निर्यात ८५.५ अब्ज डॉलर्सची, तर ४६.१ अब्ज डॉलर्सची आयात झाली. भारतीय टेक्सटाईल, जेम्स-ज्वेलरी, ऑटो पार्ट्स, फार्मा, फिशरी आदी. उद्योगक्षेत्र वाढलेल्या टॅरिफमुळं चिंताग्रस्त झाले होते. त्यात आणखी टॅरिफवाढ करण्याची धमकी देण्यासह ट्रम्प व त्यांचे सहकारी भारतीय अर्थव्यवस्थेची थट्टा उडवत असताना भारत मात्र, ट्रम्प यांना प्रत्युत्तर देण्यात शक्ती वाया घालवण्याऐवजी इतर देशांसोबत व्यापारी संबंध वाढवून भारतीय उत्पादनांसाठी बाजारपेठा शोधत होता. त्याचाच परिपाक म्हणून अवघ्या वर्षभरात भारतानं ब्रिटन, ओमान, न्यूझीलंड आणि युरोपीयन महासंघासोबत मुक्त व्यापार करार केला. २२ देशांच्या अरब महासंघासोबतही भारताची व्यापार चर्चा सुरू आहे. त्यात २७ युरोपीयन देशांच्या युरोपीयन महासंघासोबत तब्बल १८ वर्षांनी आकाराला आलेला व्यापार करार हा मदर ऑफ ऑल डील ठरला. भारत आणि युरोपीय महासंघ अनुक्रमे जगातील चौथी आणि दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून जागतिक जीडीपीत त्यांचा एकत्रित वाटा २५ टक्के तर, जागतिक व्यापारात एक तृतीयांश हिस्सा आहे. २०२४-२५ मध्ये, भारत-ईयूमधील वस्तूंचा द्विपक्षीय व्यापार ११.५ लाख कोटी रुपये (१३६.५४ अब्ज अमेरिकी डॉलर्स) होता, ज्यामध्ये ६.४ लाख कोटी रुपयांची (७५.८५ अब्ज डॉलर्स) निर्यात आणि ५.१ लाख कोटी रुपयांची (६०.६८ अब्ज डॉलर्स) आयात झाली होती. २०२४ मध्ये भारत-ईयूतील सेवांचा व्यापार ७.२ लाख कोटी रुपयांपर्यंत (८३.१० अब्ज डॉलर्स) पोहोचला. या दोन मोठ्या वैविध्यपूर्ण आणि पूरक अर्थव्यवस्था व्यापार करारातून एकत्र येताच अवघ्या आठवडाभरात ट्रम्प वठणीवर आल्याचं म्हटलं जातंय. ट्रम्प यांनी घेतलेली माघार भारताच्या परराष्ट्र-व्यापारी धोरणांचा नैतिक विजयही मानला जातोय.

सध्या ब्राझील, चीनवर अनुक्रमे ५० टक्के आणि ४७.५ टक्के सर्वाधिक टॅरिफ आहे. द.आफ्रिकेवर ३० टक्के, मेक्सिकोवर २५ टक्के टॅरिफ आहे. दक्षिण-आग्नेय आशियातील देशांपैकी बांगलादेश, श्रीलंका, तैवान आणि व्हिएतनामवर २० टक्के तर, पाकिस्तान, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, कंबोडिया आणि फिलिपाईन्सवर १९ टक्के टॅरिफ आहे. अमेरिकेला समान वस्तू निर्यात करर्णाया देशांपैकी बांगलादेश, चीन, इंडोनेशिया आदी देश भारताचे प्रतिस्पर्धी आहेत. त्यांच्या तुलनेत भारतावरील १८ टक्क्यांचा टॅरिफ हा कमीच असल्यानं भारतीय निर्यातदारांना फायदा होईल, असं म्हटलं जातंय. डोनाल्ड ट्रम्प हे जितके बेरकी उद्योजक तितकेच आपमतलबी राजकारणी आहेत. सातत्यानं कडवट वक्तव्य करणं, धमक्या देणं, एकतर्फी विधानं करून समोरच्याला नामोहरम करण्यात ते पटाईत आहेत.

ज्याप्रमाणं आपण जपान, इंडोनेशिया, युरोपीयन महासंघ, ब्रिटनला झुकवून त्यांच्यासोबत आपल्याला हवा तसा व्यापार करार करून घेतला, त्याप्रमाण भारताला झुकवता येत नसल्यानं मागच्या वर्षभरापासून त्यांचा जळफळाट सुरू होता. भारतानंही त्यांच्यापुढं ५०० अब्ज डॉलर्सहून अधिक किमतीच्या वस्तू-सेवा खरेदीचं गाजर टाकलंय. भारत-अमेरिकेत नेमका कोणत्या अटी-शर्थींवर व्यापार करार झालाय. ट्रम्प लगेचच कसे काय नरमले. आदींबाबतचा तपशील अद्याप बाहेर आलेला नाही. ट्रम्प यांनी म्हटल्याप्रमाणं भारत रशियाकडून तेल विकत घेणं थांबवणार आहे की नाही हेदेखील अद्याप स्पष्ट नाही. कृषि, दुग्ध, मत्स्य क्षेत्रासंबंधी संदिग्धता कायम आहे. त्यामुळं भारत-अमेरिकेच्या व्यापार करारात स्पष्टता येईपर्यंत भारताच्या विजयाचे ढोल पिटण्यापेक्षा जरा वेट अँड वॉच करणंच योग्य ठरेल.

# भयमुक्त परीक्षा

**फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता दहावी व बारावीच्या लेखी परीक्षा सुरू होत आहेत. या कालावधीत विद्यार्थ्यांना भयमुक्त व आत्मविश्वासपूर्ण वातावरण मिळणे गरजेचे आहे. अभ्यास, योग्य मार्गदर्शन, पालक-शिक्षकांचा सकारात्मक सहभाग आणि मानसिक स्वास्थ्य यांचा समतोल साधल्यास विद्यार्थी निर्धास्तपणे परीक्षेला सामोरे जाऊन यश संपादन करतील.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इयत्ता बारावी आणि इयत्ता दहावीची लेखी परीक्षा सुरू होत आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च २०२६ या दरम्यान तर इयत्ता दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. त्यामुळे कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी शिक्षण मंडळाने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक यांना तशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच दक्षता समिती व भरारी पथकांची नियुक्ती सुद्धा करण्यात आली आहे. असे असले तरी परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी भयमुक्त वातावरणात परीक्षा देणे गरजेचे आहे. त्यासाठी परीक्षेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांचा उत्साह वाढवायला हवा. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. भयमुक्त म्हणजे विद्यार्थी आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जातील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी वर्षभरातील केलेला अभ्यास अतिशय महत्त्वाचा असणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी शाळेत नियमित जाऊन नियमितपणे अभ्यास केलेला असेल त्यांना परीक्षेचे भय वाटणार नाही. असे विद्यार्थी आनंदाने परीक्षेला सामोरे जातात. जे विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा करतात असे विद्यार्थी जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे तणावाखाली येत असतात. त्यामुळे त्यांना परीक्षेला जाताना भय वाटत असते. याला कारणं सुद्धा अनेक असतील. मात्र विद्यार्थ्यांना आपले ध्येय गाठायचे असेल तर अभ्यास महत्त्वाचा असतो. शाळा सुरू झाल्यापासून विद्यालयामध्ये जसा अभ्यास शिकवून झालेला असेल त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करून अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास एके अभ्यास जरी केला तरी आपण एक विद्यार्थी आहोत, आपल्यासाठी कोणीतरी परिश्रम करीत आहेत याची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांचे विचार शिक्षणाशी निगडित असावेत. शिक्षणामुळेच आपण मोठे होऊ शकतो याची जाणीव त्यांच्यात निर्माण व्हायली हवी. महत्त्वाची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीचे वेळेवर जेवण घ्यावे. व्यायाम करावा, खेळ व पुरेशी झोप घ्यावी. मात्र अति विचार टाळावेत. अनाठायी वेळ वाया घालवू नये. त्यात मध्ये टी. व्ही.वरील कार्यक्रम व बातम्या पाहाव्यात यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात अधिक भर पडत असते. असे नियमित करायला हवे. हीच खरी यशाची गुरुकिल्ली असते. परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी मन शांत ठेवणे गरजेचे असते. मन शांत ठेवल्याने अभ्यासामध्ये मन रमते. याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मनातील परीक्षेची भीती आपोआप निघून जाते. खोडकर मित्रांचा नाद सोडून चांगल्या मित्रांच्या सहवासात राहावे. मोबाईलला चार हात दूर ठेवावे. आवश्यक कामासाठी मोबाईलचा वापर करावा. याचा परिणाम परीक्षेची तयारी झाल्याने विद्यार्थी हसत हसत आनंदाने परीक्षेला जातात. बरेच विद्यार्थी अभ्यासात चुकारपणा केल्याने परीक्षेच्या कालावधीत मानसिक तणावाखाली दिसतात. याचा परिणाम आपण काय करावे काय करू नये याचा विचार करीत विद्यार्थी असतात. अशावेळी त्यांच्या मनातील भीती घालविण्यासाठी किंवा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्याला तसेच त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे गरजेचे आहे. परीक्षेपूर्वी प्रत्येक विद्यालयांनी किंवा एकत्रितपणे मानसोपचार तज्ञांचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात यावेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होते.



## तूरडाळ पकोडा

**साहित्य :** १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलेचा तुकडा किसून, चिमूटभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

**कृती :** प्रथम तूरडाळ निवडून धुऊन घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल मिरची घालून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल सुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भज्याचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपर नॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गरम तूरडाळ पकोडा चटणी अथवा केचपसोबत खाणस द्या.

# नेलपेंटचा रंग दर्शवतो तुमची पर्सनॅलिटी

**नखं छान दिसावीत म्हणून आपण नखांना अगदी हमखास नेलपेंट लावतो. हल्ली तर इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या आणि रंगाच्या नेलपेंट्स बाजारात मिळतात की, कोणता रंग आपण लावावा, असा प्रश्न हमखास अनेकांना पडतो. पण तरीही कितीही पेचात असलो तरी शेवटी आपण आपल्या आवडीचा रंग निवडत असतो. तुमच्या नेलपेंटचा रंग तुमची पर्सनॅलिटी दर्शवत असतो. जाणून घेऊया नेमका तुमच्या आवडीचा नेलपेंटचा रंग तुमच्या पर्सनॅलिटीविषयी काय सांगतो ते...**



**गोल्डन/सिल्व्हर रंग :** काहींना ग्लिटरी रंग लावायला आवडतात. असे रंग लावणाऱ्या व्यक्ती कायमच आकर्षित करणाऱ्या असतात. त्यांना कायम लोकांनी आपल्याकडे पाहत राहावे असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व तसे असल्यामुळे तसे होतेसुद्धा म्हणा. गोल्डन, सिल्व्हरचे शेड लावणारे लोक म्हणूनच थोडे खास असतात.

**लाल रंग :** काहींना लाल रंगाच्या शेड्स इतक्या आवडतात की, तुम्हाला कायम त्यांच्या बोटांना लाल रंगाचीच नेलपेंट दिसून येते. लाल रंगामुळे तुमची बोटं अगदी चार चौघात उठून दिसतात. असे व्यक्ती फार सेक्सी, धाडसी असतात. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी असते.



**काळा रंग :** हल्ली खूप जण काळ्या रंगाची नेलपेंट लावताना दिसतात. काळा रंग हा ट्रेंडमध्ये असला तरी त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. काळ्या रंगाची नेलपेंट लावणारे लोक कलात्मक असतात. म्हणजे त्यांना कला क्षेत्राची आवड अधिक असते. फॅशन, संगीत अशा क्षेत्रात काम करणारे व्यक्ती असतात. काळा रंग जरी त्यांची पर्सनॅलिटी खुलवत असेल तरी अशी लोक मनाने फारच हळवी असतात.



**गुलाबी रंग :** आता महिलांना सर्वसाधारणपणे नेलपेंटसाठी आवडणारा रंग म्हणजे गुलाबी. आता या गुलाबी रंगातही बरेच शेड्स आहेत. म्हणजे तुम्ही हॉट पिंक हा शेड लावत असाल,तर तुम्ही बोल्ड विचारांचे असता. त्यांच्यातील सद्सद्विवेकबुद्धी चांगली असते. तर फिकट गुलाबी रंग लावणारे हळव्या मनाचे असतात. त्यांना इतरांची काळजी घ्यायला खूप आवडते. अशा व्यक्तींना इतरांची काळजी फार असते.

**निळा रंग :** हल्ली निळा रंगाच्या नेलपेंट्स लावायला अनेकांना आवडते. निळा रंग शांतता आणि सामंजस्याचे प्रतीक असते. अशा व्यक्ती शांत आणि समजूतदार असतात. त्यांना त्याच्या नियमानुसार वागायलाच आवडते. त्यामुळे कोणताही अन्य मार्ग स्वीकारायला तयार नसतात.

**निऑन रंग :** थोडेसे भडक असे निऑन रंग असतात. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगाची शेड असते. नवीन आयडियाज आणि नवीन आव्हानांसाठी ही लोक तयार असतात. या लोकांमध्ये कमालीची ऊर्जा असते. यांना नेहमी नव्या कल्पना सुचतात.

**न्यूड रंग :** नखांचा रंगाला जाईल असे रंग म्हणजे न्यूड रंग खूप जणांना आवडतात. अशा व्यक्ती फार स्थिर असतात. त्यांना त्यांच्या तत्त्वांना चिकटून राहायला आवडते. त्यांना त्यांचा क्लास मेंटेन करायला आवडते.

# मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या सततच्या वापराने शरीरावर होऊ शकतात दुष्परिणाम ?

**आपण संपूर्ण दिवसभरात अनेक प्रकारची गॅजेट्स वापरत असतो. या गॅजेट्समार्फत जगभरातील घडामोडी अगदी घरबसल्या आपल्याला समजत असतात. पण या गॅजेट्सच्या सतत वापराचा परिणाम आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे होऊ शकतो. गॅजेट्सच्या आहारी गेल्याने निद्रानाशासारखे त्रास जाणवू लागल्याचे आपण अनेकदा ऐकत असतो, पण या गॅजेट्समुळे आपल्या शरीरावरही अनेक प्रकारचे दुष्परिणाम होत असतात, याचा विचार करणेही अगत्याचे आहे.**

काही व्यक्तींना मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहताना सतत डोळे बारीक करून पाहण्याची सवय असते. त्यामुळे डोळ्यांच्या अवतीभोवती सुरकुत्या पडू लागतात, तसेच डोळ्यांवरही सतत ताण जाणवू लागतो. त्यामुळे स्क्रीनकडे बघताना डोळे बारीक करून बघणे टाळावे. कॉम्प्युटर किंवा मोबाइल आपल्या शरीराच्या खूप जवळ ठेवणे हे टाळावे. या गॅजेट्समधून बाहेर पडणारे रेडिओमॅग्नेटिक किरण आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. तसेच कॉम्प्युटर किंवा मोबाइल स्क्रीनमधील अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचा आणि डोळे या दोहोंना अपाय होऊ शकतो.कॉम्प्युटर वर काम करताना आपण वापरतो ती खुर्ची आरामदायक असेल असे पहावे. काही व्यक्तींना दिवसभर कॉम्प्युटरवर काम करावे लागते, त्यांनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यावी. खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल, तर त्याचा ताण पाठीच्या मणक्यांवर जाणवायला लागून, पाठदुखीचा त्रास सुरू होऊ शकतो. तसेच सतत बसून काम केल्याने पायांकडे होणारे रक्ताभिसरण व्यवस्थित न होऊन, पायांवर सूज येऊ लागते. असे होऊ नये म्हणून थोड्या थोड्या वेळाने जरासे पाय मोकळे करण्यासाठी ऑफिस मध्येच किंवा घरातल्या घरात पायी चालावे किंवा लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करावा. अनेक व्यक्तींना मोबाइल फोन खांद्याच्या व कानाच्या मध्ये धरून, एकीकडे काम करत बोलण्याची सवय असते. अशा पद्धतीने जास्त वेळ बोलत राहिल्यास मानेचे दुखणे उद्भवू शकते. तसेच कॉम्प्युटरवर खाली मान झुकवून काम करत असल्यासही मानदुखीचा त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कॉम्प्युटरचा स्क्रीन नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असेल अशा पद्धतीने ठेवायला हवा.

रात्री झोपायच्या अर्धा तास आधीपासून कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर करणे थांबवावे. त्याऐवजी मन शांत करणारे आपल्या आवडीचे एखादे चांगले पुस्तक वाचावे, किंवा शांत संगीत ऐकावे. त्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.



# खास फीचरसह लॉक करा तुमचं सिमकार्ड, फोन हरवल्यावर किंवा चोरी झाल्यावर देखील राहील सुरक्षित

**जर तुम्हाला तुमचा फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर सिमकार्ड किंवा नंबरचा गैरवापर टाळायचा असेल, तर सिमकार्ड लॉक करता येईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्हीमध्ये मिळत आहे.**

स्मार्टफोन्समध्ये कितीही फीचर्स असले तरी त्यात खरा जीव सिमकार्ड टाकल्यावर येतो. कॉलिंग असो किंवा एसएमएस आणि मोबाइल डेटाचा वापर करण्यासाठी सिमकार्डची आवश्यकता असते. विशेष म्हणजे तुम्ही हवं असल्यास तुमचं सिमकार्ड लॉक करू शकता, त्यामुळे फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर त्याचा गैरवापर करता येत नाही.

स्मार्टफोनवर लॉक सेटअप करतो तसं सिमकार्ड पण लॉक करता येतं. जर तुम्ही हे फीचर इनेबल केलं, तर सिमकार्डचा गैरवापर करता येणार नाही. कोणीही दुसरा युजर तुम्ही सेट केलेला पिन एंटर केल्याविना सिम वापरू शकणार नाही. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्ही डिवाइसेजमध्ये सहज इनेबल करता येतं.

### अँड्रॉइड फोनमध्ये असं लॉक करा सिम

- सर्वप्रथम सेटिंग्स ओपन करा आणि मग सिक्युरिटी सेटिंग्स मध्ये जा.
- तिथे सर्वात खाली स्क्रोल केल्यावर मोअर सेटिंग्स वर टॅप करा.
- त्यानंतर सिमकार्ड लॉकची निस्वाद करा आणि पिन सेटअप करा.
- पहिल्यांदा तुम्हाला डिफॉल्ट पिन एंटर करावा लागेल आणि त्यानंतर नवीन पिननं सिमकार्ड लॉक करण्याचा पर्याय मिळेल.
- वेगवेगळ्या टेलिकॉम ऑपरेटर्सचा डिफॉल्ट पिन वेगवेगळा असतो. नवीन



पिननं सिमकार्ड लॉक केल्यावर पिन एंटर केल्याविना सिम कार्डचा वापर करता येणार नाही.

### आइओएस डिव्हाइसमध्ये असं लॉक करा सिम

- तुमच्या आयफोनच्या सेटिंग्स मध्ये जा आणि तिथे मोबाइल डाटा वर टॅप केल्यावर सिम पिनचा पर्याय निवडा.
- त्यानंतर डिफॉल्ट पिन एंटर करूनच तुम्हाला पुढे जात येईल.
- पुढे तुम्हाला चेंज पिन ऑप्शनवर टॅप केल्यावर तुमचा नवीन पिन एंटर करावा लागेल, म्हणजे सिम कार्ड लॉक होईल.
- हा पिन एंटर केल्याविना सिमकार्ड वापरता येणार नाही. फोन रीस्टार्ट केल्यावरदेखील हा पिन टाकावा लागेल.

## उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी
# जीवनशैलीत करा हे बदल

**आजकाल** प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये.

वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे.

नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.



# तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...

**ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...**





**सर्वप्रथम** आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

**व्हिटॅमिन सी :** हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्रं, लिंबू आणि मोसंबी

**व्हिटॅमिन ए :** याचे मुख्य स्त्रोत आहे- पपई, संत्रं, एग यॉर्क

**व्हिटॅमिन बी :** हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

**व्हिटॅमिन इ :** हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

# पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय



पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

**कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात**

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो. लागणारे साहित्य

- कोमट पाणी कोरफडचा गर मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळा नंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.

# पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त

**आपल्या** दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो.



फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्काल्सी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात.

भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.के. के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात.

कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

# जांभूळ खा आणि तंदुरुस्त राहा

- जांभळामध्ये असलेल्या मधुमेहविरोधी गुणधर्मामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. जांभळामुळे रक्तातील स्टार्च आणि साखरेचं रूपांतर ऊर्जेमध्ये होतं.
- जांभळाच्या फळासोबतच जांभळाच्या बियांची पावडर, जांभळाच्या झाडाची साले, जांभळाचा रस याचाही मधुमेहाच्या उपचारात चांगला उपयोग होतो.
- जांभळाच्या झाडाच्या सालाची आणि बियांची पावडर पोटाच्या विकारावर गुणकारी असते. डायरिया, अपचन, जुलाब यासारख्या आजारात ती फायदेशीर ठरते.
- जांभूळ नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करते. जांभळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोह म्हणजेच आर्यन असतं. त्यामुळे जांभूळ खाल्ल्यानेही रक्तातील हिमोग्लोबीन वाढतं.
- जांभळात मोठ्या प्रमाणात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वं असतं. तसेच खनिजंही असतात त्याचा उपयोग डोळ्यांचं आणि त्वचेचं आरोग्य सुदृढ ठेवण्यास होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.
- जांभूळ थंड फळ असल्यानं पोटातील आग आणि अपचन यावर उपयोगी असतं.
- जांभूळ खाल्ल्यानं दात आणि हिरड्या मजबूत होतात. तसेच दात आणि हिरड्यात संसर्ग होत नाही.
- जांभळाच्या बियांची पावडर गायीच्या दुधात मिक्स करून हा लेप चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरच्या मुरुम, पुटकुळ्या निघून जातात.
- ज्यांना भूक लागण्याची समस्या आहे त्यांनी जांभळाचं व्हिनेगर/ सिरप दिवसातून दोन ते तीन वेळेस पाण्यासोबत समप्रमाणात घेतल्यास भूक वाढते.
- जांभळाच्या ज्यूसचा उपयोग अशक्तपणा, ॲनेमिया यावरही होतो. तसेच जांभळाच्या ज्यूसच्या नियमित सेवनानं स्मरणशक्ती वाढते.



# लिव्हर (यकृत)साठी घरगुती उपाय गुणकारी

**स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.**



- आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.
- जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.
- जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.
- जवसाच्या बियांमध्ये साइटोकॉन्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.
- बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात.

**दंड किती?**

- खुल्या आणि सार्वजनिक जागांवर आंघोळ (रु. ३००), लघवी करणे (रु. ५००), शौच करणे (रु.५००), मोकळ्या जागी व सार्वजनिक ठिकाणी प्राणी किंवा पक्ष्यांना खाद्य देणे (रु. ५००), सार्वजनिक ठिकाणी भांडी, कपडे, इतर कोणत्याही वस्तू धुणे (रु.३००), वाहन धुणे (रु.५००)
- कचरा वर्गीकरण न करता व स्वतंत्र डब्यांमध्ये साठवून न ठेवता सुपूर्द केल्यास पहिल्या गुन्ह्यासाठी (वैयक्तिक रु. २०० आणि मोठ्या प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्यांसाठी रु. १०००)
- अनधिकृत किंवा नियुक्त नसलेल्या ठिकाणी बांधकाम व पाडकाम कचरा अस्ताव्यस्तपणे टाकणे (प्रतिवाहन रु. २०,०००), विनापरवाना बांधकाम व पाडकाम कचऱ्याची वाहतूक करणे (प्रतिवाहन रु. २५,०००)
- बागेतील कचरा व झाडांची छाटणी निर्दिष्ट केल्याप्रमाणे न करणे (रु.२००), व्यावसायिक कारणांसाठी / मोठ्या प्रमाणात कचरा जाळणे (रु.१०,०००)
- मासे, कुक्कुटपालन आणि मांसविषयक कचरा स्वतंत्रपणे वर्गीकरण करून न देणे (रु.७५०), कंटेनर, कचरा टोपली, कचरापेटी नसलेले विक्रेते, फेरीवाल्यांसाठी (रु.७५०), कचरा स्वतंत्रपणे वर्गीकरण करून न देणारे विक्रेते, फेरीवाले (रु.७५०)
- घरासमोरील गटार (घराचा नाला) स्वच्छ न ठेवणे (रु.५००), पाळीव प्राण्यांनी कचरा पसरवणे/ शौच करणे (रु.१०००), सार्वजनिक मेळावा, कार्यक्रमानंतर ४ तासांच्या आत स्वच्छता न केल्यास स्वच्छता ठेव जप्त करणे अशी कारवाई होईल.

# मुंबईकरांनो, आता रस्त्यावर थुंकणं, कचरा टाकणं पडणार महागात

## महापालिका आकारणार २५ हजारांपर्यंत दंड, कशासाठी किती दंड?




■ **बातमी /लेख, विनोद दशगथ मेढे**

अस्वच्छता करणाऱ्यांवर वचक बसावा आणि महसुलातही वाढ व्हावी, या उद्देशाने आकारल्या जाणाऱ्या दंडात मुंबई महापालिकेकडून वाढ करण्यात आली आहे. यासाठी नव्याने तयार केलेल्या उपविधीला (बाय लॉ) नुकतीच अंतिम मंजुरी देण्यात आली, त्याची अंमलबजावणी मुंबई महापालिकेकडून सुरू करण्यात आली आहे. नागरिक किंवा आस्थापनांनी यासंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

'मुंबईतील घनकचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी मुंबई महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. याच अनुषंगाने, मुंबई महानगरात निर्माण होणाऱ्या किंवा आणल्या जाणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण व प्रक्रिया यासंबंधी सर्व बाबींचे नियमन करण्याच्या हेतूने तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल विभागाने जारी केलेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६च्या पार्श्वभूमीवर, महापालिकेकडून घनकचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी), स्वच्छता आणि स्वच्छताविषयक उपविधी-२०२५ जारी करण्यात आला आहे', असे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी यांनी सांगितले.

उपविधीतील नियम कचरा निर्माण करणारे सर्व व्यक्ती, सार्वजनिक व खासगी ठिकाण; निवासी, व्यापारी, वाणिज्यिक, व्यावसायिक, औद्योगिक, शासकीय, निमशासकीय, प्रशासकीय, शैक्षणिक, धार्मिक, मनोरंजनात्मक, सामाजिक तसेच इतर सर्व प्रकारच्या वापराच्या स्थळांसाठी लागू असतील.

# फुगे घेऊन लिफ्टमध्ये शिरला, काही क्षणांत अनर्थ

## मुंबईत भयंकर घटना, अंगावर काटा आणणारा व्हिडीओ

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील गोरेगावात एक भयंकर घटना घडली आहे. इमारतीमधील एका लिफ्टमध्ये गॅसनं भरलेल्या फुग्यांचा स्फोट झाला. स्फोट होताच लिफ्टमध्ये असलेले सगळेच जण घाबरुन पळाले. या दुर्घटनेत दोन जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. काळजाचा ठोका चुकवणारी घटना सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

लिफ्टमध्ये असलेल्या सीसीटीव्हीत संपूर्ण दुर्घटना कैद झाली आहे. या फुटेजमध्ये एक तरुणी काखेला पर्स लावून आणि हातात एक ट्रॉली घेऊन लिफ्टमध्ये शिरताना दिसत आहे. ती आत येताच तिच्या मागोमाग एक जण येतो. त्याच्याकडे प्लास्टिकची एक मोठी पिशवी असते. त्यात गॅस भरलेले बरेच फुगे असतात. फुग्यांनी भरलेले पिशवी घेऊन तो लिफ्टमध्ये जातो. या मुलाच्या मागोमाग आणखी एक जण आत शिरतो.

तिघे आत शिरताच लिफ्ट बंद होऊ लागते. लिफ्ट पूर्ण बंद होणार तितक्यात फुग्यांचा अचानक स्फोट होतो. आगीच्या ज्वाळा पसरतात. लिफ्टमध्ये असलेले तिघेही जण लिफ्टमधून बाहेर धावतात. या दुर्घटनेत दोन जण जखमी झाले आहेत. त्यात एका तरुणाचा आणि एका तरुणीचा समावेश आहे.



लिफ्टमध्ये झालेला स्फोट काळजाचा थरकाप उडवणारा आहे. स्फोट झाला तेव्हा लिफ्टचं दार उघडलं. लिफ्ट जर बंद असती, तर मोठा अनर्थ घडला असता. कोणालाही बाहेर पडण्याची संधीच मिळाली नसती. दुर्घटनेची तीव्रता वाढली असती. फुग्यांचा स्फोट होताच लिफ्टचं दार उघडलं. लिफ्टमध्ये असलेले सगळे जण जीव मुठीत धरुन पळाले. मात्र तरीही या दुर्घटनेत दोन जण जखमी झाले.

वाढदिवसाच्या निमित्तानं आयोजित केल्या जाणाऱ्या पार्ट्या, अन्य समारंभांमध्ये फुग्यांचा वापर सर्रास केला जातो. अनेकदा हे फुगे फुलवून कार्यक्रमस्थळी नेले जातात. त्यामुळे ही घटना अनेकांना सतर्क करणारी आहे. अनेकदा मुलं फुग्यांनी खेळतात. तेच फुगे घेऊन लिफ्टमधून प्रवास करतात. हा प्रकार किती धोकादायक ठरु शकतो, याची प्रचिती गोरेगावात घडलेल्या घटनेमुळे आली आहे.

# मुंबई विमानतळावर प्रवाशांनी भरलेल्या दोन विमानांच्या पंखांची एकमेकांना धडक

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतून आताची सर्वात मोठी घटना समोर येत आहे. मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या दोन विमानांचे पंखे एकमेकांना धडकल्याची माहिती आहे. संबंधित घटना ही मुंबई विमानतळाच्या टॅक्सी-वेवर घडली. विशेष म्हणजे दोन्ही विमानांमध्ये प्रवाशी होते. सुदैवाने या घटनेत कुणालाही दुखापत झालेली नाही. तसेच मुंबई विमानतळावर मोठी दुर्घटना यामुळे टळल्याचं आता बोललं जात आहे. महाराष्ट्र नुकताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या घटनेमुळे हादरला आहे. त्यानंतर आज रात्री मुंबई विमानतळावर अनपेक्षित घटना घडली. पण सुदैवाने या घटनेत कोणतीही हानी झालेली नाही. प्रवाशांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून सवोतीपरी उपाययोजना केल्या जात असल्याची माहिती आहे.

# रस्त्याअभावी १८ वर्षीय युवकाचा मृत्यू... झोळी बांधून दवाखान्यात नेताना वाटेतच सोडला जीव



"विक्रमगड विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक गावात रस्ते व्हावेत याकरिता वन मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांच्याकडे निधी उपलब्ध करत रस्ते व्यवस्था बळकट व्हावी म्हणून मागणी केली आहे."

**हरिश्चंद्र भोये, आमदार, विक्रमगड विधानसभा**

■**जव्हार। प्रतिनिधी,**

तालुक्यातील तिलोंडा (आंबेपाडा) येथील रस्ताविहीनतेचा भीषण परिणाम पुन्हा एकदा समोर आला आहे. १८ वर्षीय शैलेश मगन वागदडा हा युवक गंभीर आजारी असताना वेळेवर उपचार न मिळाल्याने मंगळवारी (४ फेब्रुवारी) पहाटे मृत्युमुखी पडला.रस्त्याच्या नामुष्कीने जव्हार तालुक्यात आणखी एक रुग्ण मृत्युमुखी पडला.

गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने गावकर्यांनी शैलेशला डोली बांधून दवाखान्याकडे नेण्याची वेळ आली. मात्र, उशीर झाल्याने त्याचा प्राण वाचू शकला नाही.

तिलोंडा (आंबेपाडा) हे आदिवासीबहुल गाव आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. पावसाळ्यात तर या गावाचा संपर्क पूर्णतः तुटतो. रुग्णवाहिका किंवा चारचाकी वाहन गावात पोहोचू शकत नसल्याने आजारी रुग्णांना खडतर डोंगरवाटांवरून डोळीनेच हलवावे लागते. शैलेशच्या बाबतीतही हेच घडले. प्रकृती गंभीर असतानाही वेळेवर दवाखान्यात पोहोचणे शक्य न झाल्याने त्याचा दुदैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर गावात तीव्र संताप व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रस्ता, आरोग्य सुविधा यासाठी मागणी करूनही ग्रामसेवक, सरपंच किंवा संबंधित विभागांकडून कोणताही ठोस पाठपुरावा झाला नाही, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. प्रशासनाकडून केवळ आश्वासनांचीच खैरात झाली असून प्रत्यक्षात मात्र परिस्थिती ह्यजैसे थेह्ण असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

या घटनेने तालुक्यातील दुर्गम भागांतील आरोग्य व दळणवळण व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका युवकाचा बळी गेल्यानंतर तरी प्रशासन जागे होणार का, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रस्त्यासह मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यात याव्यात, अन्यथा आंदोलनाचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा

## सरकारी यंत्रणा हादरली




■ **मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य सरकारची अत्यंत लोकप्रिय आणि महत्त्वाकांक्षी असलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सध्या एका वेगळ्या कारणाने चर्चेत आहे. नंदुरबार जिल्ह्यात एका धक्कादायक प्रकारामुळे चर्चेत आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना सक्षम करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या या योजनेचा लाभ काही पुरुषांनी लाटल्याचे उघड झाले आहे. नंदूरबार जिल्ह्यातील तब्बल ७१० पुरुषांनी या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केले होते. मात्र जिल्हा प्रशासनाच्या सतर्कतेमुळे हा अजब आणि गंभीर गैरप्रकार वेळेत उघडकीस आला आहे.

नेमका प्रकार काय?

नंदुरबार जिल्हा महिला व बालकल्याण विभागामार्फत सध्या प्राप्त अर्जांची युद्धपातळीवर छाननी प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेदरम्यान आधार कार्ड, बँक तपशील आणि लिंग यांची पडताळणी करत असताना अधिकाऱ्यांना काही अर्जामध्ये संशयास्पद बाबी आढळल्या. अर्जाची अधिक सखोल चौकशी करण्यात आली. यावेळी महिलांसाठीच्या या योजनेत चक्क ७१० पुरुषांनी आपले अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट झाले. या पुरुषांनी केवळ अर्जच भरले नाहीत, तर त्यासोबत आवश्यक कागदपत्रे जोडून योजनेचा हप्ता मिळवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

हा प्रकार निर्दशनास येताच जिल्हा प्रशासनाने तातडीने सूत्रे हलवत खालील पावले उचलली आहेत. महिला व बालकल्याण विभागाने हे सर्व ७१० पुरुष अर्जदारांचे अर्ज तातडीने अपात्र ठरवून पोर्टलवरून बाद केले आहेत. प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हा प्रकार प्राथमिक छाननीच्या स्तरावरच पकडला गेल्यामुळे एकाही पुरुष अर्जदाराच्या खात्यात योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत. यामुळे सरकारी निधीचा होणारा गैरवापर टळला आहे. या प्रकारानंतर प्रशासनाने अधिक कडक पावले उचलली आहेत. प्रत्येक अजार्ची आणि त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांची आता सूक्ष्म पातळीवर तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.

**अर्जदारांवर कायदेशीर कारवाई होणार?**

केवळ महिलांसाठी राखीव असलेल्या योजनेत खोटी माहिती देऊन किंवा लिंग लपवून अर्ज सादर करणे हा एक प्रकारे शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न मानला जात आहे. या योजनेचा मूळ उद्देश गरजू महिलांना आधार देणे आहे. मात्र अशा कृत्यांमुळे शासकीय यंत्रणेवर विनाकारण ताण येतो, असे मत प्रशासकीय सूत्रांनी व्यक्त केले आहे. आता या ७१० पुरुष अर्जदारांवर फौजदारी गुन्हे दाखल होणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तसेच योजनेच्या पारदर्शकतेवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

## भुईगाव समुद्रकिनाऱ्यावरील सुरुची झाडे कोसळली...

# किनारपट्टी धूपेमुळे निसर्गसौंदर्य धोक्यात

■**वसई। प्रतिनिधी,**

वसई तालुक्यातील भुईगाव समुद्रकिनाऱ्यावरील दाट सुरुच्या झाडांची बाग सध्या गंभीर संकटात सापडली आहे. समुद्राच्या वाढत्या धूपेमुळे आणि भरतीच्या पाण्यामुळे येथील शेकडो सुरुची झाडे कोसळलेली असून, अनेक झाडे मुळासकट उन्मळून पडलेली दिसत आहेत. निसर्गरम्य वातावरणासाठी आणि शांत पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेला भुईगाव समुद्रकिनारा धोक्यात असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुमारे २५ वर्षांपूर्वी शासन आणि स्थानिक ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून भुईगाव समुद्रकिनारी १२ हजारांहून अधिक सुरुच्या झाडांची लागवड करण्यात आली होती. या झाडांमुळे किनाऱ्याची धूप रोखण्यास मदत होत होती तसेच समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्यातही भर पडत होती. प्री-वेडिंग फोटोशूट, सहली आणि पक्षीनिरीक्षणासाठी हे ठिकाण पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरले होते. मात्र मागील दोन ते तीन वर्षांपासून परिस्थिती झपाट्याने बदलू लागली आहे.

सतत वाढणारी समुद्राची भरती, अतिवृष्टी आणि किनारपट्टी भागात वाढलेले अतिक्रमण यामुळे समुद्राचे पाणी थेट सुरुच्या बागेत आणि शेतजमिनीत घुसत आहे. परिणामी आत्तापर्यंत सुमारे पाच हजारांहून अधिक सुरुची झाडे भरतीच्या पाण्याची शिकार झाली असल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि जोरदार भरतीमुळे मागील काही दिवसात शेकडो झाडांचा खच समुद्रकिनाऱ्यावर पडलेला पाहायला मिळत आहे.

या झाडांच्या पडझडीमुळे केवळ पर्यावरणीय नुकसान झालेले नसून किनाऱ्यालगतच्या



शेतकऱ्यांनाही मोठा फटका बसत आहे. सुरुच्या बागेमुळे मिळणारा वाऱ्याचा अडथळा आणि जमिनीचे संरक्षण आता कमी झाले आहे. यामुळे भविष्यात शेती, वस्ती आणि रस्त्यांनाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून गावकरी, पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक कार्यकर्ते भुईगाव समुद्रकिनारी मजबूत संरक्षक बंधारा बांधण्याची मागणी प्रशासनाकडे सातत्याने करत आहेत. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. हवामान बदलाचा परिणाम, वाढवण क्षेत्रात समुद्रात करण्यात आलेला सुमारे पाच हजार एकर क्षेत्रफळाचा आणि तीस फूट उंचीचा भराव यामुळे भुईगावसह रानगाव व अनाळा येथील किनारपट्टी समुद्रातही ही समस्या निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. प्रशासनाने उपलब्ध निधीचा तातडीने वापर करून मजबूत संरक्षक बंधारा बांधावा आणि भुईगाव समुद्रकिनारा वाचवावा अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# पाणवेलींनी व्यापले वसई विरारचे नाले



■**वसई ।प्रतिनिधी,**

वसईतील सनसिटी परिसरात असलेल्या मुख्य नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणवेल पसरल्याने नाल्याची गंभीर दुरवस्था झाली आहे. नाल्यातील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह पूर्णपणे अडथळलेला असून पाणी साचल्यामुळे परिसरात अस्वच्छता आणि तीव्र दुर्गंधी पसरली आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनाच्या दुर्लक्षाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वसई विरार शहरात अनेक मोठे नाले आहेत. मात्र यापैकी बहुतांश नाल्यांची नियमित स्वच्छता होत नसल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सनसिटी रोडवरील हा मुख्य नाला शहरातील दूषित पाणी वाहून नेतो. मात्र नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणवेल साचल्याने संपूर्ण नाला हिरवळीने गच्च भरलेला दिसून येत आहे. पाणवेलीमुळे पाण्याचा प्रवाह बंद झाल्याने नाल्यात सांडपाणी साचून राहत असून त्यामुळे दुर्गंधी अधिक तीव्र झाली आहे.

या साचलेल्या दूषित पण्यामुळे परिसरात डास आणि विविध कीटकांचा प्रादुर्भाव वाढत आहे. परिणामी डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांचा धोका वाढल्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्तींना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता असून, वेळीच उपायोजना न केल्यास परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नाल्यात साचलेल्या पाणवेलीमुळे नाल्याची रुंदी व खोली कमी झाली असून पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका वाढला आहे. जोरदार पावसात नाला तुडुंब भरून पाणी रस्त्यावर येण्याची शक्यता आहे. आरोग्यविभागाकडून केवळ औषध फवारणी केली जात असली तरी नाल्याची नियमित स्वच्छता न झाल्यास ही उपाययोजना अपुरी ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. साचलेल्या दूषित पाण्यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत असून जमिनीच्या पाण्यावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नाल्याच्या स्वच्छतेसाठी अनेकदा स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे. नाल्यातील गाळ, कचरा आणि पाणवेल काढण्यासाठी यांत्रिक पद्धतीने स्वच्छता करणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

दरम्यान, वसई विरार शहरात महापौरपदाची निवड झाल्याने प्रशासकीय राजवटीचा कालावधी संपुष्टात आला आहे. आता शहरातील सर्व विकासकामे महापौरपदांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत. त्यामुळे नाल्यांच्या स्वच्छतेसह शहरातील स्वच्छता, आरोग्य आणि पायाभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांवर तातडीने लक्ष दिले जाईल, तसेच प्रशासन अधिक जबाबदारीने काम करेल अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# भांडुपमधील लग्नाच्या रिसेप्शनमध्ये थरार! लिफ्ट तिसऱ्या मजल्यावरून थेट बेसमेंटमध्ये कोसळली



**७ ते ८ जण लिफ्टमध्ये, पती बाहेरच थांबले**

तिसऱ्या मजल्यावरून खाली उतरण्यासाठी वर्षा या सात ते आठ जणांसह लिफ्टमध्ये चढल्या. जागा कमी असल्याने त्यांचे पती सुषांत बाहेरच थांबले. लिफ्ट खाली जात असताना अचानक तांत्रिक बिघाड झाला आणि काही क्षणांतच लिफ्ट प्रचंड वेगाने थेट तळघरात कोसळली.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

भांडुप पश्चिमेतील पोलीस ठाण्याच्या समोर असलेल्या 'स्टार बँक्वेट' हॉलमध्ये रविवारी रात्री भीषण दुर्घटना घडली. लग्नाच्या रिसेप्शनच्या पाहुण्यांनी भरलेली लिफ्ट अचानक तिसऱ्या मजल्यावरून थेट तळमजल्यावर कोसळल्याने एकच गोंधळ उडाला. या दुर्घटनेत किमान चार ते पाच जण जखमी झाल्याची माहिती आहे.

या प्रकरणी वर्षा सुषांत गुरखे (वय ३४) यांच्या पतीने भांडुप पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. वर्षा सध्या भांडुपमधील खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. वर्षा या एलबीएस रोडवरील शांतिनिकेतन सहकारी गृहनिर्माण संस्थेत राहतात आणि पवईतील एल अँड टी कंपनीत सहाय्यक व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. १ फेब्रुवारी रोजी स्टार बँक्वेट हॉलमध्ये त्यांचा सहकारी व मित्र प्रतिक यांच्या लग्नाचा रिसेप्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम संपल्यानंतर वर्षा आणि त्यांचे पती सुषांत घरी जाण्यासाठी निघाले होते.

**बेसमेंटमध्ये धाव, आरडाओरड**

लिफ्ट कोसळल्याचा जोरदार आवाज ऐकताच सुषांत गुरखे आणि इतरांनी बेसमेंटकडे धाव घेतली. आत अडकलेले लोकं मदतीसाठी ओरडत होते. एकच गोंधळ उडाला होता. काही वेळानंतर लिफ्टचे दरवाजे उघडण्यात आले आणि जखमींना बाहेर काढण्यात आले.

**दोषी आढळणाऱ्या सर्वांवर कारवाई, पोलिसांची माहिती**

वर्षा गुरखे यांच्यासह तीन ते चार जणांना भांडुपमधील क्रिटिकेअर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार वर्षा यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून गुडघ्याजवळ फ्रॅक्चर झाले आहे. त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच भांडुप पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. प्राथमिक स्वरूपात लिफ्टच्या देखभालीची जबाबदारी असलेल्या कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भांडुप पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी सांगितले, "तपासानंतर दोषी आढळणाऱ्या सर्वांवर कारवाई करण्यात येईल."

**हॉलच्या मालकाकडून साधी विचारपूसही नाही, सर्वांवर कठोर कारवाई करा**

दरम्यान, जखमी वर्षा यांचे पती सुषांत गुरखे यांनी बँक्वेट हॉलच्या व्यवस्थापनावर गंभीर आरोप केले आहेत. ह्यइतकी मोठी दुर्घटना घडूनही हॉलच्या मालकाने आमची साधी विचारपूसही केली नाही. पत्नीच्या उपचारांसाठी आम्ही रुग्णालयांमध्ये धावपळ करत आहोत. हा अपघात जीवघेणा ठरू शकला असता. केवळ लिफ्ट देखभाल कंपनी नव्हे, तर संबंधित सर्वांवर कठोर कारवाई झाली पाहिजे,ह्ण अशी मागणी त्यांनी केली.

**कागदपत्रांची तपासणी सुरू**

पोलीस सूत्रांनी सांगितले की, लिफ्टची देखभाल, नियमित सुरक्षा तपासणी आणि परवानग्यांशी संबंधित कागदपत्रे मागवण्यात आली असून, नेमकी जबाबदारी कोणाची आहे याचा सखोल तपास सुरू आहे. तपासाअंती पुढील कारवाई केली जाणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com